# राशिभविष्य - जून, २०११.

दादा दामले (dadadamle@hotmail.com)

**(१) मेष** -या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात मंगळ पूर्णपणे व रवि केवळ महिन्याच्या पूर्वार्धातच प्रतिकुल असणार आहे. त्यात या राशीच्या मंडळींचा हट्टी स्वभाव, मानापमान फ़ार, यांची भर पडून श्रम, दगदग सहन करावी लागल्यामुळे थकवा येणे, उष्णता भडकणे, शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे शक्य आहे. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. नोकरी-व्यवसायातील प्रतिकुल परिस्थितीमुळे तर असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि-गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध खूपच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. दिनांक ९-१० व दिनांक २२ ते २४ या पाच दिवसांच्या काळात जपून व सावधानतेने आचरण करा. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली, अकौण्टन्सी असे नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण आर्थिक व्यवहार फ़सवणूक होणार नाही याची काळजी घेऊनच करा. आर्थिक येणे असेल तर त्यात घोटाळे, विलंब होण्याची शक्यता दिसते. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख, गृहसौख्य लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखले तर शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल.

**(२) वृषभ-** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वत:च्या शारीरिक-मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे अगत्याचे होईल. कारण सतत गैरसमजुती, भांडणे अशा मनस्ताप देणाऱ्या घटना घडत असल्यामुळेच संतापाने रक्तदाब वाढण्याची शक्यता दिसते. तसेच शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळावतील. अति श्रम व दगदग यांमुळे थकवा जाणवेल. जपा. अध्यात्म, उपासना अशा गोष्टीतरस असणारांना व समाजकार्याची आवड असणारांना काळ अनुकुल होईल. नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होईल; पण मानसिक रोगतज्द्न्य व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच चिकित्सक बौद्धिक व्यवसाय व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. रवि-मंगळ-राहू प्रतिकुल असल्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. त्यामुळेच गृहसौख्यातही बाधा येणारच .या काळात बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्या. या राशीच्या शासकीय नोकरीत असणाऱ्या ज्या मंडळींना अगदी सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी त्या मार्गाचा अवलंब करू नये. मानसिक जडत्व, औदासीन्य, काही करू नयेसे वाटणे अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. जपा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि ग्रह पूर्णपणे व मंगळ ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होणार असल्याने सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडून शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यताच अधिक आहे. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन शांत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती अटोक्यात राहीलसे दिसते. मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांना विवाहयोग संभवतो. महिन्याच्या पूर्वार्धात मित्रांशी भांडणे होतील; तर उत्तरार्धात मंगळ-बुध कुयोगामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांची बुद्धी विकृत झाली नाही तर अपेक्षित शैक्षणिक प्रगती संपादन करणे शक्य होईल.

कुसंगतीपासून जपा. उच्च बौद्धिक क्षेत्र, राजकारण, अध्यात्म, उपासना अशा क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल..या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे, अशांना अशा संबंधामुळेच विविध प्रकारचे लाभ होण्याची शक्यता दिसते. अन्य प्रकारच्या नोकरी-व्यवसायात श्रम, दगदग व मनस्ताप सहन करूनच काळ व्यतीत करावा लागेल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना परदेशगमनाचे योग संभवतात.. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनिमुळे गैरसमज, स्थावरसंबंधी वाद, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुंबिक जीवनातील सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा.

(४) **कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने खूपच अनुकुल असणार आहे. वकिली, अकौंटन्सी सारखे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन, गूढविद्या संशोधन, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधीशास्त्र, कमिशन, दलाली व्यवसाय अशा क्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय सेवेत असणारांना मात्र महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात विचारशक्ती विकृत होणार नाही याची काळजी घ्या. या राशीच्या काही भाग्यवंताना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते; तर सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना कष्ट-परिश्रम करूनच महिन्याचा काळ व्यतीत करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल घटनांमुळे मनावर आघात होऊन आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. काहींना भावंडांकडून त्रास होणे संभवते. विषभय, जलभय आहे. जपा. तसेच गैरसमजामुळे वा अन्य कारणाने मित्रांशी भांडणे होणे संभवये. त्यामुळे मैत्रीत बाधा येईल. जपा. या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे काहीही कारणाने संततिसुखात व कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणींवर मात करूनच शैक्षणिक प्रगती साधावी लागेल.

(५) **सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात जीवनाच्या सर्वच आघाड्यांवर जिद्दीने, आत्मविश्वासाने व खंबीर मनाने लढावे लागणार आहे. अशा परिस्थितीत गुरुकृपेची साथ लाभून विपरीत काळाशी टक्कर देणे शक्य होईल. शनिदेवांच्या साडेसातीचा साडेपाच महिन्यांचा काळ अद्याप बाकी आहे. हळूहळू विपरीत परिस्थिती कालौघात विरून जाईल व अनुकुल काळाची चाहूल लागेल. राहू, शनि, नेपच्यून ह्या तीन ग्रहांमुळे कौटुंबिक जीवनात, वैवाहिक जीवनात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता आहे. मनावर संयम ठेवून व जिभेला लगाम घालून स्थितप्रद्न्य बनाल तर फ़ारसा त्रास होणारच नाही. रवि-बुधाच्या अनुकुलतेमुळे शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना काळ अनुकुल व लाभदायक होईल. सर्व कलाक्षेत्रातील मंडळींना केवळ महिन्याचा अखेरचा सप्ताहच अनुकुल व लाभदायक होईल. यांत्रिकतांत्रिक कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना कष्ट-दगदग व थोडा मनस्ताप सहन करावा लागेल. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील. महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो प्रवास टाळा. अतिशय त्रास व मनस्ताप होण्याची दाट शक्यता आहे. दिनांक १२ ते २४ या बारा दिवसांच्या काळात मन व बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्या. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल होईल. मात्र सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखले गेले पाहिजे.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक अनारोग्याशी मुकाबला करतच काल व्यतीत करावा लागणार आहे. मनसिक मरगळ आल्यामुळे काही होत नसले तरी उगीचच आपल्याला काही आजार झाल्यासारखे वाटेल. तसेच काल्पनिक चिंता मन अस्वथ ठेवतील. हाती घेतलेल्या कार्यात अकारण अडथळे येणे, कुटुंबातील व्यक्तींचे काही कारणाने स्थलांतर होणे, तसेच जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, मतभेदांमुळे किंवा अन्य कारणाने मनावर आघात होऊन गहरे नैराश्य येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारी व्यापार=व्यवसाय असेल त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच काही कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्या पूर्वार्धात उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही मंडळींना वारसाहक्काने व अचानक रीत्या धनलाभ होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून शैक्षणिक, बौद्धिक कार्यक्षेत्रातील मंडळींना हा काळ अधिक अनुकुल असेल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मनाला दिलासा मिळेल. राहू व्यावसायिक दृष्ट्या अनुकुल असला तरी भावंडांच्या सुखास प्रतिकुलच होईल. साडेसातीचा काळ आहे. सावधानतेने आचरण करा.

**७) तुळा -** या राशीच्या मंडळींचे मन या महिन्याच्या काळात अत्यंत भावनाशील व कोमल असे असणार आहे. त्यामुळे एखाद्या लहानशा मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनेचाही मनाला असह्य त्रास होईल. जपा. अकारण अति विचार करू नका. डोकेदुखी वा मेंदूचे दुखणे सहन करावे लागेल. दिनांक १० ते १२ हे तीन दिवस विशेष जपा. रवि-मंगळ-राहू हे तीन ग्रह अतिशय प्रतिकुल असून अनारोग्यकारकच होणार आहेत. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून मुदतीचा ताप येणे, मूळव्याधीचा त्रास होणे, तसेच वातविकारांचा आजार होण्याची शक्यता असून  शारीरिक कष्ट व दगदग होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात अपघातभय आहे. जपून चाला, वाहने सावधानतेने चालवा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने नवे मित्र मिळतील; नवे स्नेहसंबंध जुळून येतील,. या राशीच्या विवाहेच्छूंचे विवाह जमतील, विविध प्रकारचे लाभ होतील. नोकरी, व्यापार, व्यवसाय कोणताही असो, सतत मनाविरुद्ध घटना घडून असह्य मनस्ताप होईल. जपा. दिनांक १२ ते दिनांक २४ ह्या बारा दिवसांच्या काळात बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्या. अध्यात्म, उपासना अशा गोष्टीत विशेष रस असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. काही ना काही कारणाने या राशीच्या मंडळींना अपेक्षित असे संततिसुख मिळेलच याची खात्री नाही. या राशीच्या धनस्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. साडेसातीचा काळ आहे, जपून राहा.

**८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ हे दोन महत्त्वाचे ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात मानसिक दृष्ट्या व उत्तरार्धात शारीरिक-मानसिक अशा दोन्ही दृष्ट्या अनारोग्यकारकच असणार आहेत. असे अनारोग्य वैवाहिक जीवनातील कटकटींमुळेच उद्भवणार आहे. म्हणून या राशीच्या मंडळींनी मनावर व विचारांवर ताबा ठेवून  भावविचार व्यक्त न करता मौन व्रत धारण केल्यास तीव्र असे अनारोग्य होणारच नाही. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकेल व मनावरील संयम ढळून हातून नको ते घडेल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. काहींना पोटविकार, मूत्राशयविकार अशापैकी कसला तरी आजार होणे संभवते. या राशीच्या काहींना

अपप्रचाराचा तर काहींना अनपेक्षित अर्थहानीचा मनस्ताप होईल. जपा. या राशीच्या व्यापारीमंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ संभवतो. नोकरी-व्यवसायास गुरु-शनि हे दोन ग्रह पूरक होतील; व विशेष करून वकिली, अकौन्टन्सी सारखे चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होतील. सामान्य नोकरी व्यवसाय असणारांना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेला शनि इतर बाबतीत बरा असला तरी संततिसुखात बाधा आणणारा असाच असेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध संततिसुखाचे दृष्टीने प्रतिकुल व तापदायक होण्याची शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे आजार, कोणाचे अयोग्य आचरण अशापैकी कारणाने मनस्ताप होईल. पण गुरु ग्रहामुळे परिस्थिती हद्दीबाहेर जाणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र या राशीच्या मंडळींना अनारोग्याचा किंवा अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते,. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल.. महिन्याच्या उत्तरार्धात अडचणी, अडथळे वा विरोधाला सामोरे जावे लागेल. या राशीच्या व्यापारीमंडळींना स्त्री-ग्राहकांकडून अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. अध्यात्म, गूढ संशोधन अशा क्षेत्रांत रस असणारांना काळ यशदायक व प्रगतिकारक असा असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. पूर्वार्धात मनस्थिती अस्वस्थ राहिल्यामुळे मनापासून अध्ययन करणे जमेलसे वाटत नाही. पुढे ठाकलेल्या परिस्थितीत मन व बुद्धी शांत ठेवून कालक्रमणा केलीत तर बऱ्याच प्रमाणात गृहसौख्य लाभू शकेल. या महिन्याच्या काळात राहूमुळे तर महिन्याच्या उत्तरार्धात रविमुळे वैवाहिक जीवनात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याच्या काळात मंगळ ग्रह व महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे कौटुंबिक जीवनात व गृहसौख्यात काही ना काही कारणाने बाधा येण्याची शक्यता दिसते. तसेच मुलांपैकी कोणाचे आजारपण वा कोणाची आचरणविषयक समस्या यांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायात विरोधी परिस्थिती निर्माण होईल; पण उत्तरार्धात एकदम परिस्थितीत बदल होईल व सर्व काही मनोनुकुल असेच घडेल. या राशीच्या अधिकारी मंडळींना वाममार्ग धन अगदी सहज मिळण्याची शक्यता असली तरी तो मोह त्यांनी टाळणेच सुखाचे होईल. या महिन्याच्या काळात सर्व आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. आर्थिक घोटाळे वा आर्थिक चिंता होणे संभवते. चिकित्सक, उच्च बौद्धिक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व प्रसिद्धीदायक होण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या काही जणांना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग संभवतात. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने गृहसौख्य मिळेल; पण नातेवाईकांपैकी कोणाकडून त्रास होण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या काहीजणांकडून जमीन खरेदीचे वा जमीन विक्रीचे व्यवहार होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काही कारणाने अडथळे येण्याची शक्यता दिसते. जपा.

**(११) कुंभ-** या राशीच्या मंडळींचे मन सध्या अत्यंत कोमल व भावनाशील झाले असले पाहिजे.. त्यामुळे अगदी थोडेही काही मनाविरुद्ध घडले तर लगेच नैराश्य येऊन मन उदास होत असेल, असे दिसते. त्यात भर म्हणून एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जात असेल तर परिस्थिती आणखीनच विचित्र होत असेल. कधी कधी अस्थिर विचारांचा कल्लोळ होऊन हातून विचित्र आचरण घडत असल्यास तसे होणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच हातून अविचाराने खर्चही होत असावा. .पण प्रक्षुब्ध भावविचारांवर ताबा ठेवून आचरण कराल तर खूपच सुखाचे होईल. या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि ग्रह पूर्णपणे तर मगळ महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा पडण्याची दाट शक्यता दिसते. या राशीच्या काहींना राहत्या जागेसंबंधी त्रास सहन करावा लागेल. अशा परिस्थितीमुळेच या राशीच्या काहीजणांचे आरोग्य बिघडण्याचा संभव आहे. पण शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील व मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील. शेती व्यवसाय असणारांना या महिन्याचा काळ आर्थिक दृष्ट्या लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींपैकी काहीना बढती तर काहीना अधिकार, सत्तेचे स्थान प्राप्त होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनिमुळे सतत अपेक्षाभंग होणे, मन अशांत राहणे व एखादा आजार बळावण्याची शक्यता दिसते. जपा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय चंचल, अस्थिर व लहरी असा झाला असला पाहिजे. कोणाचा धाक, दडपण वा उपदेश सहन होत नसावा. या राशीच्या मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धात मंगळ व उत्तरार्धात रवि ग्रह प्रतिकुल असणार आहेत. ही स्थिती आरोग्यविघातक आहे. असह्य मनस्तापाने या राशीच्या काहीजणांची शारीरिक उष्णता भडकून घसा, मान, दात व डोळे यांपैकी कशाचे तरी आजार होण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात असह्य मनस्तापानेच अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत असणारांपैकी काहीना बढती, काहीना मानाचे स्थान तर काहीना उच्च पद मिळण्याची शक्यताही दिसते. तसेच काहींना भूमिलाभ होणेही संभवते.. गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल होईल. या राशीच्या व्यापारीमंडळींना स्त्री-ग्रहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याचा अखेरचा सप्ताह अनेक मनोनुकुल घटना घडून सुखसमाधान लाभेल. कुसंगतीपासून सावध राहा. वैवाहिक जीवनात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे व या राशीच्या मंडळींच्या लहरी स्वभावामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरुमुळे महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या मंडळींना व्यापारात प्रगती, व्यवसायात वाढ, नोकरीत उत्तम अर्थलाभ होईल व सुखसमाधान लाभेल.

-----०००-----